ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ३१ जानेवारी, १९५१ अंक ५


## बँक ऑफ महाराष्ट्र लि.

महाराष्ट्राच्या मानाचें स्थान




संचालक मंडळ

श्री. धों. कृ. साठे ( अध्यक्ष ), श्री. श्री. गो. मराठे ( उपाध्यक्ष ), श्री. न. ग. पवार, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. वी. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. मो. रा. ढमढेरे, श्री, भा. म. गुप्ते.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

हेड ऑफिस-लक्ष्मी रोड पुणें २

स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

*पॅलेस स्ट्रीट, सातारा.*

शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.

ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :


| १ वर्ष | दोन वर्षं | तीन अगर अधिक वर्षें |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | „ | २-०-० |
| चालू डिपॉझिट | „ | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

## रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

## पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २१७३८


## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**बिहारमधील कातड्याचा धंदा**—बिहारच्या सरकारनें कातडी कमावण्याच्या छोट्या उद्योगधंद्यांसाठीं एक योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेला दरवर्षी ५४,००० रुपये खर्च येईल आणि प्रथम एकदां १६,००० रुपये खर्च करावे लागतील. राज्यांतील हा धंदा वाढीला लावण्याचा योजनेचा हेतु आहे व ती एक वर्ष तरी अंमलांत आणण्यांत येणार आहे.

**अरविंदबाबूंच्या तत्त्वज्ञानाची शिकवण**—अमेरिकेंतील कॅलिफोर्निआ विद्यापीठानें सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ अरविंद घोष ह्यांच्या तत्त्वज्ञानाचें शिक्षण देण्यासाठीं स्वतंत्र प्राध्यापकाची जागा निर्माण केली आहे. प. बंगालच्या कृष्णनगर कॉलेजमधील तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर डॉ. हरिदास चौधरी ह्यांना ह्या जागेवर दोन वर्षांसाठीं नेमण्यांत आलें आहे. कॅलिफोर्निआ विद्यापीठांत अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ एशिअन स्टडीज् अशी शाखा आहे. तिच्यातर्फे वरील उपक्रम करण्यांत आला आहे.

**ब्रह्मदेशाकडून तांदूळ आणि लाकूड मिळणार?**—ब्रह्मदेशाकडून तांदूळ, लाकूड आणि इतर कांहीं माल मिळविण्याच्या दृष्टीनें भारतीय सरकार त्या देशाशीं एक दीर्घ मुदतीचा व्यापारी करार करणार असल्याची बातमी आहे. करारासंबंधींच्या वाटाघाटी लवकरच सुरू होतील.

**नवीन रेल्वे एंजिनें**—नॉर्थ ब्रिटिश लोकोमोटिव्ह कंपनीनें गेल्या वर्षी तयार केलेल्या १४३ रेल्वे एंजिनांपैकीं ३४ एंजिनें भारताला पाठविण्यांत आलीं. ह्या कंपनीनें १९४५ ते १९५० ह्या पांच वर्षांत ७३४ रेल्वे एंजिनें परदेशांना पाठविलीं. एंजिनें विकत घेण्यांत भारताचा दुसरा अनुक्रम लागतो. भारतानें १४२ एंजिनें विकत घेतलीं.

**कापड महागलें**—भारत सरकारच्या टेक्स्टाइल कमिशनरनें एक पत्रक काढून हलक्या व वरच्या दर्जाच्या कापडाची व सुताची किंमत वाढविण्यांत आल्याचें जाहीर केलें आहे. हलकें कापड ७॥ टक्क्यांनीं व चांगलें व उत्कृष्ट दर्जाचें कापड अनुक्रमें १९ व ६ टक्क्यांनीं वाढलें आहे. सुताची भाववाढहि अशीच होणार आहे. मध्यम दर्जाच्या कापडाच्या किंमती मात्र वाढविण्यांत आलेल्या नाहींत.

**मुंबईला ४,००० टेलिफोन्स मिळणार**— १९५१ सालीं मुंबई शहराला नवे टेलिफोन्स देणें शक्य होईल असें जाहीर झालें आहे. पुढील वर्षाच्या मध्याच्या सुमाराला कलकत्ता शहरांत ९,००० ऑटो टेलिफोन्स बसविण्यांत येतील. टेलिफोन्स बनविणारी यंत्रसामुग्री लवकरच भारतांत येणार आहे.

**प्रदर्शन पहाणारांची यांत्रिक नोंद**—ह्या वर्षी लंडनमध्यें फेस्टिव्हल ऑफ ब्रिटन ह्या नांवाचें एक मोठें औद्योगिक प्रदर्शन भरणार आहे. ह्या प्रदर्शनाला भेट देणारांची नोंद करण्यासाठीं विजेच्या साह्यानें चालणारें यंत्र बसविण्यांत येणार आहे. पहाणारे लोक आंत जातील अगर बाहेर जातील त्यावेळीं हें यंत्र बेरीज वजाबाकी करीत राहील आणि ५०,००० ची संख्या झाल्यावर इषारा देऊन प्रदर्शनाचें द्वार आपोआप बंद करील.

**मोटारीवरील कराविषयीं तक्रार**—ब्रिटनमधून पाकिस्तानांत आयात होणाऱ्या मोटारींवर पाकिस्तान सरकार जो आयात कर घेतें त्याबद्दल ब्रिटिश सरकारनें तक्रार केली आहे. ज्या मोटारींची किंमत पाकिस्तानांत ७,५०० रु. पर्यंत असेल, त्यांच्या किंमतीवरील जकात १९५१ पासून ४८ टक्क्यांऐवजी ५१ टक्क्यांपर्यंत वाढविण्यांत आली आहे. १९४९–५० सालीं पाकिस्तानानें ब्रिटनकडून २·६६ कोटी रु. च्या मोटारी विकत घेतल्या. पौंडाची किंमत उतरल्यामुळें ब्रिटिश मोटारींच्या किंमती कमी झाल्या, म्हणून आयात करांत वाढ करण्यांत आली असें समजतें.

**चीनमध्यें चैनीवर कर**—चीनच्या सरकारनें चैनीच्या संवयींवर कर बसविण्याचें ठरविलें आहे. सिनेमा, उपहारगृहें, नृत्यालयें, जेवणाची व रहाण्याची सोय करणारीं हॉटेल्स, ह्यांचा उपयोग करणारांवर नवीन कर बसविण्यांत आला आहे. प्रवेश मिळविण्यासाठीं अगर रहाण्यासाठीं जितके पैसे द्यावे लागतील, त्याच्या ५ ते ५० टक्केपर्यंत कराची वसुली करण्यांत येणार आहे.

**युगोस्लाव्हिआनें किंमती उतरविल्या**—युगोस्लाव्हिआच्या सरकारनें अन्न, कपडे, जळण आणि साबण ह्यांच्या किंमती कमी केल्या आहेत. उलटपक्षीं काड्याच्या पेट्या, मीठ, पॅराफिन, तंबाखू इत्यादि मालाच्या किंमती वाढविल्या आहेत. ह्या वस्तूंचें उत्पादन सरकार मक्तेदारीनें करीत आहे. ह्या हुकुमामुळें शहरांतील कामगारांना कापड व इतर गरजेच्या वस्तूंबद्दल ८० टक्के कमी किंमत द्यावी लागेल.

**मध्यप्रदेशांत नियोजन बोर्ड**—मध्यप्रदेश सरकारनें प्रांतांतील आर्थिक बाबींविषयीं सल्ला देण्यासाठीं स्टेट प्लॅनिंग बोर्ड नांवाची संघटना निर्माण केली आहे. ह्या बोर्डाचें अध्यक्षपद राज्याच्या मुख्य प्रधानांकडे रहाणार असून त्यांत विधिमंडळाचे चार सभासद, सरकारी अधिकारी आणि अर्थशास्त्रज्ञ ह्यांचाही समावेश करण्यांत येणार आहे. राज्यांतील जनपदसभांनीं आपल्या पुरत्या योजना आखून त्या बोर्डाकडे सादर करावयाच्या आहेत.

**धोतरजोड्या महागणार**—इजिप्तमधील कापसाच्या किंमती पौंडामागें ५ रुपयांनीं वाढल्यामुळें तो कापूस वापरणें अहमदाबादच्या गिरण्यांना कठीण होईल असें गिरणी मालक संघाचे उपाध्यक्ष शेठ नंददास हरिदास ह्यांनीं जाहीर केलें आहे. गिरण्यांतून इजिप्तचा कापूस वापरावयाचा झाल्यास एका धोतरजोडीची किंमत गिरणींतच २१ रुपयांपर्यंत चढेल असेंहि त्यांचें म्हणणें आहे.

**हातमाग कापडावरील विक्री कर**—हातमागाच्या कापडावरील विक्रीकरांत ५० टक्के कपात करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. गिऱ्हाइकाला कापड विकतांना हा कर घेण्यांत येतो. त्याचा आकार रुपयामागें ३ पै असा आहे. करांत कपात केल्यामुळें मद्रास सरकारचें ३·८८ लाख रुपये उत्पन्न दरवर्षी बुडणार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती–गरम–रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ३१ जानेवारी, १९५१



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताच्या परराष्ट्रीय भांडवली येण्या-देण्याची गणती

### रिझर्व्ह बँकेच्या चौकशीचा निष्कर्ष

रिझर्व्ह बँकेनें भारताच्या परराष्ट्रीय भांडवली येण्या-देण्याची ३० जून, १९४८ रोजींची गणती केली, तिच्या आधारावर तिनें तयार केलेला रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला आहे. दीर्घ मुदतीच्या, अल्प मुदतीच्या, खासगी, सरकारी, इत्यादि परराष्ट्रीय येण्या-देण्यांचा तपशील त्यामुळें उपलब्ध झाला आहे. परकीय भांडवलाच्या भारतांतील गुंतवणुकीमुळें तिला उत्पादनांत नियंत्रक अधिकार कितपत मिळाले आहेत, भारतीयांनीं परदेशांत कशी मालमत्ता मिळविलेली आहे, इत्यादि माहितीहि त्यांत आढळते. रिझर्व्ह बँकेनें २ ऑक्टोबर, १९४८ रोजीं नोटिफिकेशन काढली, तिला अनुसरून व्यक्ती व संस्था ह्यांनीं मिळून २८,००० फॉर्म भरून दिले. त्यांतील माहिती व आकडे एकत्रित करून रिपोर्ट तयार करण्यांत आला आहे. रिपोर्टामध्यें सहा प्रकरणें असून त्यानंतर उपयुक्त माहितीचीं परिशिष्टें देण्यांत आलीं आहेत.

भारताच्या परराष्ट्रीय देण्याचा तपशील खालीलप्रमाणें आहे:—

### भारताचें सरकारी व खाजगी देणें

| | |
|---|---|
| एकूण परराष्ट्रिय देणें:— | १०४६ कोटी रु. |
| त्यापैकीं सरकारांचें देणें:— | ६४८ कोटी रु. |
| खासगी देणें:— | ३९८ कोटी रु. |

| | |
|---|---|
| सरकारी देण्यापैकीं दीर्घमुदतीचें:— | |
| ( जून, १९४९ नंतर द्यावयाचें ) | ४२६ कोटी रु. |
| अल्प मुदतीचें:— | |
| ( जून, १९४९ पर्यंतचें देणें ) | २२२ कोटी रु. |

| | |
|---|---|
| खासगी देण्यापैकीं 'पोर्टफोलिओ' देणें:— | |
| ( केवळ व्याजासाठी गुंतवणूक ) | १४४ कोटी रु. |
| 'डायरेक्ट' देणें:— | |
| ( गुंतवणुकीबरोबर नियंत्रण असलेलें ) | २५४ कोटी रु. |

| | |
|---|---|
| 'पोर्टफोलिओ' देण्यापैकीं बँकांचें अल्पमुदती देणें, इ. :— | ७८ कोटी रु. |
| परकीयांनीं धारण केलेले हिंदी कंपन्यांतील सर्व प्रकारचे शेअर्स:— | ६६ कोटी रु. |

### भारताचे सरकारी व खाजगी येणें

भारताची इतर देशांतील गुंतवणूक मुख्यत: बिगर-औद्योगिक स्वरूपाची आहे. एकूण २३९१ कोटींची मालमत्ता आपण परदेशांत धारण करीत आहों. त्यापैकीं २१९१ कोटी रुपये स्टर्लिंग ( पौंडी ) येण्याचेच आहेत आणि फक्त १९५ कोटी रुपये खाजगी व्यक्तींच्या मालकीचे आहेत.

वरील हिशोबावरून, देण्याघेण्याचा विचार करतां भारताचें येणें देण्यापेक्षां सुमारे १३०० कोटी रु. नीं जास्त आहे असें आढळून येईल. ३० जून, १९४८ रोजींची ही परिस्थिति आहे. पाकिस्तानकडे वर्ग केलेले व अदाप करावयाचे स्टर्लिंग. रोखे, गणतीनंतरच्या काळांत भारताच्या परराष्ट्रीय येण्या-देण्यांत आलेली तूट, लष्करी सामानासाठीं द्यावयाचा मोबदला, इत्यादि बाबी हिशोबांत दाखल केल्या तर अनुकूल तफावत बरीच कमी होईल. भारतांतील परराष्ट्रीय गुंतवणुकीचें मूळ किंमतींतून बाजारी किंमतींत रूपांतर केलें, तर ही अनुकूल तफावत आणखीहि कमी होईल, आणि ती सुमारें फक्त ६६४ कोटी रु. भरेल असा अंदाज आहे.

### भांडवली घेणेकरी, परंतु जमा-नांवेंत देणेकरी

रिझर्व्ह बँकेच्या नोटांस तारण म्हणून कांहीं किमान रक्कम स्टर्लिंगमध्यें शिल्लक ठेवावयासच हवी. ती ४०० कोटी रु. तरी पाहिजे असा ३१-३-१९५० रोजींच्या परिस्थितीवरून अंदाज बांधतां येईल. ६६४ कोटींतून ४०० कोटी रुपये वजा केले, म्हणजे मूळ दिसणारी अनुकूल तफावत व्यावहारिक दृष्टीनें किती तरी लहान झालेली आढळून येईल. भांडवली येणें हें भांडवली देण्यापेक्षा जरी ज्यास्त असलें, तरी तेवढ्यानें समाधान मानतां येणार नाहीं. कारण, भांडवली येण्यावर जेवढें व्याज व डिव्हिडंड मिळतें त्यापेक्षा भांडवली देण्यावर आपण ज्यास्त व्याज व डिव्हिडंड देत आहों; म्हणजे भांडवली हिशेबांत आपण घेणेकरी असलों तरी जमा-नांवें हिशेबांत आपण देणेकरीच ठरतो.

### प्रथम संकलनाचें अवघड कार्य

रिझर्व्ह बँकेनें तयार केलेला हा रिपोर्ट अत्यंत माहितीपूर्ण व उपयुक्त असून, त्या संबंधांतील तो पहिलाच प्रयत्न आहे. अमेरिका, कॅनडा व ग्रेट ब्रिटन येथें परराष्ट्रीय येण्यादेण्याचा ताळेबंद कसा तयार केला जातो, ह्याची प्रत्यक्ष माहिती मिळविण्यासाठीं रिझर्व्ह बँकेनें आपले दोन अधिकारी मुद्दाम त्या देशांकडे १९४७ मध्यें पाठविले होते. त्याच सुमारास, अशा प्रकारच्या माहितीची मागणी इं. मो. फंडानें आपल्या सभासद-राष्ट्रांकडे केली आणि भारतास ती तयार करावयाची होतीच. डिसेंबर १९४८ मध्यें रिझर्व्ह बँकेनें एक स्वतंत्र बॅलन्स ऑफ पेमेंटस् खातेंच निर्माण केलें व त्याकडे भारताच्या आंतरराष्ट्रीय येण्या-देण्याचा ताळेबंद तयार करण्याचें काम सोपविलें. प्रस्तुत रिपोर्ट हें त्या खात्याच्या कामाचेंच फळ होय. ह्या गणतीमधील माहिती अद्यावत राखण्यासाठी मधून मधून विशिष्ट क्षेत्रांतून नवी माहिती गोळा करण्याचा रिझर्व्ह बँकेचा विचार आहे. प्रस्तुत रिपोर्ट २९१ पृष्ठांचा असून तो अनेक तक्ते व माहितीचीं कोष्टकें ह्यांनीं परिपूर्ण आहे.

---

**खजुराची आयात**—भारतीय सरकारनें पूरक अन्न म्हणून १०,००० टन खजूर इराककडून घेण्याचें ठरविलें आहे. त्यापैकीं १४,०० टन खजूर नुकताच मुंबई बंदरांत आला आहे. खजुराची वांटणी मुंबई, बिहार, द. हैदराबाद व मध्यप्रदेश ह्या राज्यांतून करण्यांत येणार आहे. मध्यप्रदेशाला ५,००० टन आणि मुंबई राज्याला २,००० टन खजूर देण्यांत येणार आहे.

## महाराष्ट्रीय बँकांस मार्गदर्शन

### एकत्रीकरणाचा प्रश्न

मराठा चेंबरच्या अध्यक्षांनीं महाराष्ट्रीय बँकांना एकत्रीकरणाबाबत चेंबरच्या सहामाही सभेंत जी जाहीर सूचना केलेली आहे, ( पृ. २७ पहा ) तिचें महत्त्व, चेंबरच्या अध्यक्षांची जबाबदारीची जागा लक्षांत घेतां, विशेष समजलें पाहिजे. महाराष्ट्रीय बँकांचा एक स्वतंत्र संघ गेल्याच वर्षी अस्तित्वांत आलेला असून, तो संघ आपल्या सभासद–बँकांचें हित जपण्यासाठींच प्रयत्न करीत असणार, हें उघड आहे. बँक ऑफ महाराष्ट्र लि. चे चेअरमन श्री. घों. कृ. साठे हे बँकांच्या ह्या असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. श्री. दांडेकर ह्यांनीं जाहीर सूचना करण्यापूर्वी महाराष्ट्रीय बँकांच्या प्रतिनिधींशीं व त्यांच्या संघाशीं विचारविनिमय केला असलाच पाहिजे व त्यांच्या चर्चेचें प्रतिबिंब म्हणजेच चेंबरच्या अध्यक्षांची सूचना होय, असा स्वाभाविकच निष्कर्ष निघतो. महाराष्ट्रीय बँकांतून एक मध्यवर्ती, भक्कम बँक निर्माण होण्याचें अगत्य श्री. दांडेकर ह्यांनीं प्रतिपादन केलें आहे, आणि बंगाली बँकांच्या एकत्रीकरणाचा दाखलाहि पण दिला आहे. कोणत्या परिस्थितीमुळें बंगाली बँकांवर आपत्ति आली, हें समजून घेतलें तर महाराष्ट्रीय बँकांच्या परिस्थितीचें भिन्नत्व तात्काळ लक्षांत येतें. महाराष्ट्रीय बँकांचा कारभार इतर ठिकाणच्या बँकांच्या मानानें बऱ्याच उच्च दर्जाचा आहे, असें साधारणपणें म्हणतां येईल. त्यांचे सचोटीबद्दल कोठेंहि बभ्रा ऐकूं आलेला नाहीं. त्यांच्या ठेवीदारांनीं बँकांकडे पैशाची तातडीची मागणी चालविलेली नाहीं. बहुतेक बँका नफ्यांत चालू आहेत आणि बहुतेकांस बँकिंग अवार्ड लागू नसल्याकारणानें त्यामुळें त्यांचा खर्च तात्काळ वाढणारा नाहीं. अशा परिस्थितीमध्यें, महाराष्ट्रीय बँकांनीं एकत्रित होण्याची जाहीर सूचना देण्यांत आज विशेष काय प्रयोजन होतें, हें समजणें कठीण आहे. महाराष्ट्रीय बँकांच्या असोसिएशननें एकत्रीकरणाचे बाबतींत चेंबरशीं कांहीं वाटाघाटी केल्या आहेत काय आणि त्यास चेंबरचा पाठिंबा देण्याचा श्री. दांडेकर ह्यांचा हेतु आहे काय? श्री. दांडेकर ह्यांचे भाषणांत त्याबाबत कांहींच उल्लेख आढळत नाहीं.

महाराष्ट्रीय बँकांचें परस्पर सहकार्य वाढावें, त्या नुकसानींत चालूं नयेत, ठेवीदार व भागीदार ह्यांच्या हिताची योग्य जपणूक व्हावी, ह्याबद्दल दुमत होण्याचें कांहींच कारण नाहीं. बँकांच्या असोसिएशननें एकत्रीकरणाच्या जाहीर सूचनेचे बाबतींत स्वतःची भूमिका स्पष्ट करणें ठेवीदार व भागीदार ह्यांच्या दृष्टीनें योग्य असेंच होईल. श्री. दांडेकर ह्यांच्या सूचनांवर कांहीं इंग्रजी वृत्तपत्रांत जी टीका प्रसिद्ध झाली आहे, ती पहातां त्यांच्या सूचनेबाबत निष्कारण गैरसमज पसरत आहे असें आढळून येतें. त्याबाबत योग्य तो खुलासा चेंबरनें व असोसिएशननें तात्काळ करणें सर्वांच्याच हिताचें होईल. बँकाच्या एकत्रीकरणाची योजना तयार असेल असें आम्हांस वाटत नाहीं. एकत्रीकरणाच्या कल्पनेस केवळ चालना देण्यासाठीं केलेली जाहीर घोषणा निष्कारण हानिकारक होऊं नये ह्यासाठीं दक्षता बाळगली पाहिजे. महाराष्ट्रीय बँकांची सुदृढ परिस्थिति दृढतर होण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्यास बँकांनीं तयारी दाखविली पाहिजे हें उघड आहे. परंतु, लहान तथापि भक्कम पायावर आधारलेल्या बँकांवर अन्याय होऊं नये, हेंहि तितकेंच खरें आहे.

महाराष्ट्रीय बँकांनीं सध्यापेक्षा अधिक सहकार्यानें संघटना करावी आणि बाहेरील बँकांच्या स्पर्धेस तोंड देण्यास जास्त समर्थ व्हावें; त्यासाठीं शक्य त्या प्रकारें एकसूत्रीपणा आणावा, एवढाच श्री. दांडेकर ह्यांच्या सूचनेचा तूर्त मथितार्थ आहे, असें आम्हीं मानतों. बंगाली बँकांच्या एकत्रीकरणाची पार्श्वभूमि अगदीं भिन्न होती; महाराष्ट्रीय बँकांत आज कोठेंहि घाबरण्याजोगें कांहीं झालेलें नाहीं; चालू संस्थांचें जाळें अधिक कार्यक्षम करण्याइतकाच त्यांच्या सूचनेचा अर्थ मर्यादित आहे, अशा स्वरूपाचा अधिकृत खुलासा करण्यांत यावा अशी आमची त्यांस आग्रहाची विनंति आहे. महाराष्ट्रीय बँकांचें एकत्रीकरण झालें तर तें केव्हांहि स्वागतार्हच होईल. बंगालमध्यें एकत्रीकरण घडून आलें, तें तेथील बिकट परिस्थितीच्या दडपणामुळेंच होय. महाराष्ट्रांतील परिस्थिति तशी नाहीं; त्याकारणानें स्वतंत्र संस्था विनाकारण दुसऱ्या संस्थांत सामील होण्यास सहजासहजी तयार कशा होतील? तथापि, एकत्रीकरण आज व्यवहार्य नसलें तरी त्यांचेमधील सहकार्य अधिक घनिष्ठ व प्रभावी होणें अगदीं शक्य आहे. तें तसें घडून येण्यास श्री. दांडेकर ह्यांच्या सूचनेमुळें चालना मिळाली तर उत्तमच होईल.


# NOTICE

**THE BANK OF MAHARASHTRA, LIMITED**

Notice is hereby given that the 16th Ordinary General Meeting of the Share holders of the Bank of Maharashtra, Ltd. will be held at the Registered Office of the Bank, Kakakuva Mansion, Laxmi Road, Poona City on Sunday the 25th day of February, 1951 at 4 P. M. (S. T.) to transact the following business:—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the Reports of the Directors and of the Auditors for the year ended 31st December, 1950.

(2) To declare a Dividend.

(3) To elect three Directors in the places of the retiring Directors who are eligible for re-election.

(4) To appoint Auditors and to fix their remuneration.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.

By Order of the Board

Poona City. } C. V. Joag,
24th January, 1951 } Manager.

*N. B.*— The Shares Transfer Books of the Bank will be closed from the 22nd day of February, 1951 to the 2nd day of March, 1951, both days inclusive.

* The Dividend, when declared, will be payable on and after Saturday, 24th March 1951 and the Dividend-warrants will be posted to the Registered addresses of the Share holders. *Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.*

## भारताची नैसर्गिक संपत्ति आणि तिचा औद्योगिक विनियोग

(प्रॉडक्ट्स् अँड प्रोससेस,इंडियाज नॅचरल रिसोर्सेस अँड देअर यूस इन इंडस्ट्री. लेखकः-डॉ. जी. आर. केळकर, पी. एच.डी. एम. एस्सी. व एम. एस. वर्दे, एम. एस्सी. प्रकाशकः-मॅकमिलन आणि कंपनी. पृ. सं. १.२१ किं. १ रु. १० आ.)

भारताजवळ प्रचंड नैसर्गिक संपत्ति असूनहि भारतीयांच्या रहाणीचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे आणि आपल्या राष्ट्राच्या संरक्षणाचे बाबतींत आपण परावलंबी बनलों आहों. भांडवलाच्या, यंत्रसामुग्रीच्या व तंत्रज्ञांच्या अभावामुळें ही गंभीर परिस्थिति आली असून, आपली नैसर्गिक संपत्ति तातडीनें कारणीं लावण्याचें अगत्य विचारवंतास पटलें आहे. डॉ. केळकर व श्री. वर्दे ह्यांनीं पुस्तकाच्या प्रस्तावनेंत रहाणीच्या मानावर भर दिला असला, तरी आजच्या स्फोटक परिस्थितींत प्रत्यक्ष आस्तित्वाचाच प्रश्न अधिक महत्त्वाचा झाला आहे हें विसरून चालणार नाहीं. भारतांतील कांहीं निवडक कच्च्या मालाचा औद्योगिक उपयोग कसा करतां येणें शक्य आहे, हें प्रस्तुत पुस्तकांत लेखकांनीं दाखवून दिलें आहे. सामान्य वाचकाला सहज समजेल अशा सोप्या इंग्रजी भाषेंत, कच्च्या मालाचें रूपांतर करण्याच्या क्रिया वर्णन करून सांगितल्या असून ज्यास्त खोल माहिती हवी असणारांसाठी प्रत्येक प्रकरणाचे शेवटीं त्या संबंधांतील वाङ्मयाचें दिग्दर्शन करण्यांत आलें आहे. सामान्य नागरिकांप्रमाणें कॉलेजांतील विद्यार्थ्यांसहि हें पुस्तक उपयुक्त वाटेल अशी अपेक्षा आहे. नऊ चित्रांमुळें पुस्तकाच्या आकर्षकतेंत भर पडली आहे. डॉ. केळकर व श्री. वर्दे ह्यांनीं परिश्रमपूर्वक तयार केलेल्या ह्या पुस्तकाचें योग्य तें स्वागत होऊन त्यांचे श्रम सफळ होवोत.

### टॅरिफ बोर्डाच्या कचेरींतील संग्रहालय

गेल्या कांहीं वर्षांत टॅरिफ बोर्डाच्या शिफारशीनुसार संरक्षण मिळाल्यामुळें निरनिराळया भारतीय उद्योगधंद्यांनीं केलेली प्रगति, मुंबई येथील टॅरिफ बोर्डाच्या कचेरींत जनतेसाठीं खुलें ठेवलेल्या वस्तुसंग्रहालयांत दाखविली आहे. भारतीय धंद्यांचें यश दाखविणारे बटनांपासून ते सायकलीपर्यंतच्या धंद्यांतील उत्पादनाचे नमुने तेथें मांडण्यांत आले असून त्यांमुळें पूर्वी परदेशांहून आयात होणाऱ्या ग्राहकांच्या दैनंदिन गरजा पुरविण्याचे बाबतींत झालेल्या देशाच्या औद्योगिक प्रगतीची कल्पना येते.

### सक्तीच्या सहकाराविना गत्यंतर नाहीं

सहकारी चर्चा मंडळ, पुणें ह्या संस्थेतर्फे दि. २७ रोजीं सायंकाळीं प्रा. पी. एन. द्रायव्हर यांच्या व्याख्यानानें कै. प्रो. वा. गो. काळे ह्यांचा स्मृतिदिन पुणें सें.को. बँकेच्या दिवाणखान्यांत साजरा करण्यांत आला. धान्योत्पादनाचा प्रश्न सक्तीच्या सहकाराविना सुटणार नाहीं, असें व्याख्यात्यांनीं प्रतिपादन केलें. सहकारी चळवळीचे हल्लींचे उपाय मलमपट्टी इतकेहि परिणामकारक ठरत नाहींत; आतांच ह्या प्रश्नाचा विचारवंतांनीं मूलमाहि विचार करून जरूर तर अप्रियपणा पत्करूनहि उपाय-योजना केली नाहीं तर परिणाम फार घोर होतील असा त्यांनीं इशारा दिला. मंडळाचे अध्यक्ष श्री. शं. ल. ओगले ह्यांनीं व्याख्यात्यांची प्रारंभीं ओळख करून दिली व असेरीस कार्यवाह रावसाहेब ओगले ह्यांनीं समयोचित आभार मानले.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



(स्थापना १९१८)
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव


### महाराष्ट्रीय बँकांच्या एकीकरणाचा प्रश्न : बंगालनें दिशा दाखविली

"बँकांतील नोकरांच्या मागण्यासंबंधी अिंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें जो निवाडा नुकताच दिला आहे त्यामुळें लहान बँकांची विशेष कुचंबणा होणार आहे. भारत सरकारहि या निवाड्याचा बँकिंग धंद्यावर होणाऱ्या परिणामाचा विचार करीत असल्याचें कळतें. परंतु लहान बँकांनीं सदर निर्णयामुळें त्यांच्या खर्चांत होणाऱ्या वाढीचा विचार करून परस्पर सहकार्यानें कांहीं मार्ग निघतो काय याचा विचार केला पाहिजे. बंगाल्यांत नुकतीच घडून आलेली एक स्वागतार्ह घटना, महाराष्ट्रीय बँकांना या दृष्टीनें विचारार्ह वाटेल. त्या प्रांतांतील चार प्रमुख बँका कोमिल्ला बँकिंग कॉर्पोरेशन, कोमिल्ला युनियन बँक, हुगळी बँक व युनायटेड बँक ऑफ इंडिया यांचें एकत्रीकरण झालें आहे व रिझर्व बँकेनें त्यास मान्यताहि दिली आहे. या घटनेमुळे बंगाल्यांत आज एक मोठी बँक आस्तित्वांत आली आहे. या उपक्रमापासून आपणास कांहीं मार्गदर्शन होईल काय याचा विचार झाल्यास बरें होईल. एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं महाराष्ट्र जर इतर प्रांतांच्या बरोबरीनें व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत पुढें यावयाचा असेल तर इतर पुढारलेल्या प्रांतांतील बँकिंग कंपन्यांच्या तोडीच्या बँका आपल्याकडेही वाढीस लागणें अवश्य आहे." श्री. गो. ग. दांडेकर, मराठा चेंबरचे अध्यक्ष, ह्यांचें सहामाही साधारण सभेंतील भाषण. १७-१-५०

### ट्रेझरी से. डिपॉझिट्स् : आणखी तपशील

ट्रेझरी सेव्हिंग्ज डिपॉझिटवर दरसाल दर शेंकडा ३½% करमाफ व्याज दर वर्षी प्रत्यक्ष मिळणार आहे, हें गुंतविणारांस आकर्षण वाटेल. जुन्या नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांवरील व्याजासाठी मुदत भरेपर्यंत थांबावें लागत असे. डिपॉझिट ठेवल्यानंतर एक वर्षपर्यंत डिपॉझिटची रकम परत मिळूं शकणार नाहीं, परंतु त्यानंतर ती खालीलप्रमाणें कसर कापून घेऊन परत दिली जाईल:—

| वर्ष | प्रत्येक १०० रुपयांवर कसर |
|---|---|
| दुसरें | ३-८ |
| तिसरें | ५-० |
| चवथें | ५-८ |
| पांचवें | ६-० |
| सहावें | ६-४ |
| सातवें | ६-० |
| आठवें | ५-४ |
| नववें | ४-० |
| दहावें | २-४ |

दहा वर्षे पुरीं झालीं, म्हणजे १०० रुपयांचे १०० रुपये मिळतील. सहाव्या वर्षापर्यंत कसर वाढत नेण्याचें कारण, पहिल्या कांहीं वर्षांत ठेव काढून घेण्याच्या प्रवृत्तीस आळा बसावा हें आहे.

### महाड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

वरील संस्थेचा वृत्तांत "अर्था" च्या दि. ३ जानेवारीच्या अंकांत पृष्ठ ६ वर प्रसिद्ध झाला आहे. त्यांत संघाच्या सभासदांची संख्या ३२ दिली आहे, ती वास्तविक ३८२ पाहिजे.

## परराष्ट्रीय व्यापारांत सुधारणा

भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतील १९५० मधील एक उत्साहदायी बाब म्हटली म्हणजे फाळणीनंतरच्या कांहीं वर्षांत असलेली प्रतिकूल शिलकेची परिस्थिति नाहींशी झाली ही होय. रुपयाच्या अवमूल्यनानंतरच्या चौदा महिन्यांत (ऑक्टोबर १९४९ ते नोव्हेंबर १९५०) एकूण १२६१·८६ कोटी रुपयांचा व्यापार झाला. यांत आयात–व्यापार ६१३·६० कोटी रुपयांचा आणि निर्यात व्यापार ६४८·२६ कोटी रुपयांचा आहे. यावरून या वर्षी ३४·६६ कोटी रुपयांची अनुकूल शिल्लक असल्याचें दिसून येतें. याचें उलट १९४८–४९ मध्यें याच काळांत ३३२·३० कोटी रुपयांची प्रतिकूल शिल्लक होती. १९४८–४९ मध्यें (ऑक्टोबर ते नोव्हेंबर) एकूण १३६५·६८ कोटी रुपयांचा व्यापार झाला. त्यांत ८४९·२९ कोटी रुपयांचा आयात व्यापार व ५१६·३९ कोटी रुपयांचा निर्यात व्यापार होता. ही सुधारणा कांहीं अंशीं रुपयाचें अवमूल्यन, कांहीं प्रमाणांत आयातीवर जाणून बुजून घातलेलीं बंधनें व बऱ्याच अंशीं निर्यात व्यापारास देण्यांत आलेलें उत्तेजन यांमुळें शक्य झाली आहे. सप्टेंबर १९४९ मध्यें भारत सरकारनें पौंडाच्या प्रमाणांत रुपयाचें अवमूल्यन करण्याचें जाहीर केलें. यामुळें रुपयाची किंमत ३०·२२५० अमेरिकन सेंटस् या त्यावेळच्या दराऐवजीं २१ सेंटस् झाली. भारताचा व्यापार मुख्यतः पौंडी विभागांशीं असल्यामुळें मुख्यतः एक संरक्षक उपाय म्हणून भारतानें रुपयाचें अवमूल्यन केलें आहे, असें त्यावेळचे भारताचे अर्थमंत्रि डॉ. जॉन मथाई यांनीं संसदेंत सांगितलें होतें.

### १९४९ मधील परिस्थिति

दुर्लभ चलनाचे देश, पाकिस्तान पौंडी विभाग व सुलभ चलनाचे इतर देश या सर्वांशीं झालेल्या व्यापारांत तेव्हां तूट आली होती. दुर्लभ चलन विभागाच्या बाबतींतील डॉलर–तुटीची परिस्थिति १९४८ च्या पहिल्या वर्षार्धात १० कोटी रुपयांची होती ती १९४९ मध्यें याच काळांत ५० कोटी रुपयांपर्यंत गेली. त्याचप्रमाणें पौंडी विभागांबाबतची परिस्थितीही तितकीच गंभीर होती. १९४८ जून अखेरीला इंग्लंडमधील सुवर्ण व डॉलर गंगाजळी १६५० दशलक्ष डॉलरपर्यंत खालीं आली होती. १८ सप्टेंबर १९४९ ला तर ही मर्यादा सर्वांत कमी म्हणजे १३२० दशलक्ष डॉलरपर्यंत आली होती. या परिस्थितीमुळें कडक उपाययोजना करणें आवश्यक झालें आणि ऑगस्ट १९४९ मध्यें डॉलर खर्चावर ७५ टक्के कपात करण्यांत आली.

### विविध स्वरूपाचें धोरण

डॉलर खर्चावर घालण्यांत आलेले निर्बंध आणि १९४९–५० मधील धान्य आयातींत झालेली मोठ्या प्रमाणावरील घट यांमुळें आयातविषयक अंदाजपत्रकांतील सर्व खर्च कमी करण्यास बरीच मदत झाली. आयातनियंत्रण चौकशी समितीनें थोड्या वेळांत अनेक उपयुक्त शिफारशी केल्या. यांतील बहुतेक शिफारशी सरकारनें स्वीकारल्या असून १९५१ च्या जानेवारी–जून या कालांतील नवीन आयातविषयक धोरणांत त्यांचें प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें.

त्याचप्रमाणें १९४९ मध्यें नेमण्यांत आलेल्या निर्यातवाढ समितीनें केलेल्या बहुतेक शिफारशींही सरकारनें अंमलांत आणल्या आहेत. या वर्षांत अनेक देशांबरोबर परस्पर व्यापारविषयक वाटाघाटी करण्यांत येऊन करारही करण्यांत आले. ह्या धोरणानुसार सरकारनें केलेल्या उपाययोजनांचें प्रतिबिंब या वर्षाच्या व्यापाराच्या आंकडेवारींत दिसून येईल. अवमूल्यनानंतरच्या पहिल्या संपूर्ण वर्षांतील (ऑक्टोबर १९४९–सप्टेंबर १९५०) व्यापाराच्या आतां हातीं आलेल्या आंकड्यांवरून असें दिसून येतें कीं, अवमूल्यनोत्तर आयात व्यापाराचें मासिक सरकारी प्रमाण ४३·८ कोटी रुपये होतें. अवमूल्यनपूर्व वर्षांत हेंच प्रमाण ६०·६६ कोटी रुपये इतकें होतें. याउलट, अवमूल्यनपूर्व वर्षांत निर्यात व्यापाराचें मासिक सरासरी प्रमाण जें ३६·८८ कोटी रुपये होतें अवमूल्यनोत्तर वर्षांत ४६·३० कोटी रुपयांपर्यंत वाढलें. त्यामुळें व्यापाराचा कल पूर्णपणें बदलला.

### आयातींत घट

पाकिस्तानबरोबर खुष्कीच्या मार्गानें होणाऱ्या आयात व्यापारांत घट झाली आहे, कारण अवमूल्यनपूर्व वर्षांत ८७·३३ कोटी रुपयांवर असलेला हा व्यापार अवमूल्यनोत्तर वर्षांत ३२.२० कोटी रुपयांपर्यंत खालीं आला आहे, अन्नधान्यांची आयातही ११०·७ कोटी रुपयांवरून ६२·९ कोटी रुपयांवर आली आहे. आयातींत घट झालेल्या दुसऱ्या महत्त्वाच्या वस्तू म्हणजे वाहनें, कापसाचें सूत आणि कापड, रसायनें व औषधें, कटलरी सामान आणि इतर लोखंडी वस्तू, कागद, पेस्टबोर्डस व स्टेशनरी माल आणि लोकरीचें सूत आणि माल या होत. कपाशी आणि तेलें या कदाचित् फक्त दोन प्रकारच्या मालाच्या आयातीच्या किंमतींत अवमूल्यनानंतरच्या काळांत ठळक वाढ झाली आहे. कपाशीची आयात ७४·७ कोटींवरून ९४·२ कोटींवर आणि तेलांची आयात ५०·३ कोटींवरून ६१·२ कोटींवर गेली आहे.

### निर्यातींत वाढ

निर्यातीचे बाबतींत बहुतेक प्रकारच्या मालाची अवमूल्यनपूर्व किंमत केवळ कायम राहिली आहे, एवढेंच नव्हे तर त्यांतील बहुतेकांच्या किंमतींत पुष्कळशी वाढ दिसून आली आहे. निर्यात होणाऱ्या महत्त्वाच्या मालापैकीं फक्त तागाच्या वस्तू आणि कोळसा यांच्या किंमती अवमूल्यनपूर्व किंमतींपेक्षां खालीं आल्या आहेत. तागाच्या वस्तू आणि कोळसा यांच्या अवमूल्यनपूर्व निर्यातीची किंमत अनुक्रमें १३२·६७ व ४·३८ कोटी रुपये होती. ती त्यानंतर अनुक्रमें १२३·०३ आणि ३·७९ कोटी रुपयांपर्यंत घटली आहे.

इतर सर्व प्रकारच्या निर्यातीचे किंमतींत वाढ दिसून आली आहे. कापसाचें कापड आणि तुकडे–कापड यांच्या निर्यातींत विलक्षण वाढ झाली आहे. कारण १९४८–४९ मधील ३५·९६ कोटीची निर्यात, १९४९–५० मध्यें १००·१४ कोटींवर गेली. चहा, कातडीं व चामडीं, मसाल्याचे जिन्नस, कपाशी आणि खराब–कापूस, तंबाखू, अभ्रक, लाख, फळें व भाजीपाला, तेलें, कच्चीं कातडीं व चामडीं, अशुद्ध मँगनीज, कच्ची लोकर इत्यादि वस्तूंच्या निर्यातीतही सुधारणा दिसून आली.

### दुर्लभ चलन विभागांबरोबरच्या व्यापारांत वाढ

अवमूल्यनोत्तर वर्षांत एकूण आयात अवमूल्यनपूर्व वर्षापेक्षां सुमारें २१ टक्क्यांनीं खालीं आली आहे. चलनवार घट पुढीलप्रमाणें आहे:— सुलभ व मध्यम चलन विभाग सुमारें २५ टक्के, डॉलर विभाग ७ टक्के आणि इतर दुर्लभ चलन विभाग ११ टक्के. यावरून सुलभ आणि मध्यम चलन विभागांबरोबरच्या आयात व्यापारांत जास्तींत जास्त घट आली आहे हें दिसून येईल.

निर्यातीचे बाबतींत, डॉलर विभागाबरोबरचा आमचा व्यापार सुमारें ५६ टक्क्यांनीं, इतर दुर्लभ चलन विभागाबरोबरचा व्यापार

टक्क्यांनीं आणि सुलभ व मध्यम चलन विभागाबरोबरचा पार सुमारें ५ टक्क्यांनीं वाढला आहे. यावरून असें दिसून येईल अवमूल्यनानंतर डॉलर विभागांतून होणाऱ्या आयातींत सर्वांत घट आणि त्यांत होणाऱ्या निर्यातींत सर्वांत जास्त वाढ झाली है. या गोष्टीस १९४९ च्या पहिल्या सहामाहींत बंद पडलेला रिकेंतील व्यापार पुन्हां जोरांत सुरू झाला, यासारख्या इतर हीं गोष्टी कारणीभूत असल्या तरी निदान कांहीं अंशीं मूल्यनही कारणीभूत आहे.

### व्यापाराची दिशा

देशवार विचार केल्यास ब्रिटनबरोबरच्या आयात व्यापाराची मत १९४८–४९ मध्यें १८२·६० कोटी रुपये होती ती ४९–५० मध्यें ११६·३० रुपयांपर्यंत खालीं घसरली असली त्याच देशाकडून भारतास जास्तींत जास्त माल पुरवठा ण्यांत आला. ब्रिटनखालोखाल अमेरिकेंतून १९४८–४९ मध्यें २·२७ कोटी रुपये आणि १९४९–५८ मध्यें १०२·४९ टी रुपये इतक्या किंमतीची आयात झाली. अवमूल्यनपूर्व त भारतांतील आयातीचे बाबतींत पाकिस्तानचा क्रमांत ला होता. परंतु अवमूल्यनोत्तर वर्षांत त्याचा क्रमांक गेला. इराण आणि ऑस्ट्रेलिया यांचे क्रमांक अनुक्रमें ३ व असे होते.

निर्यातीचे बाबतींतही अवमूल्यनोत्तर वर्षांत भारतीय मालाची ांत मोठी बाजारपेठ ब्रिटन ही होती, कारण त्या देशानें ०·७१ कोटी रुपयांचा माल घेतला. त्याच्या खालोखाल रिका (९५·१८ कोटी रु.), पाकिस्तान (३०·४० कोटी ) आणि ऑस्ट्रेलिया (२७·४७ कोटी रु.) हे देश आहेत. मूल्यनोत्तर कालांत पाकिस्तानांत भारतीय मालाची फार कमी ांत झाली. हा एक देश वगळल्यास वरील इतर सर्व देशांकडे ाऱ्या निर्यातींत बरीच वाढ झाली आहे. उदाहरणार्थ ब्रिटनकडे ारी निर्यात १०४·०९ कोटींवरून ११०·७१ कोटींवर, रिकेकडील ६१·३४ कोटींवरून ९५·१८ कोटींवर आणि ट्रेलियाकडील २३·३३ कोटींवरून २७·४७ कोटींवर गेली .

---

### रिझर्व्ह बँक आणि शेतीला कर्जपुरवठा

शेतीला कर्ज पुरविण्याचे कामीं रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाला उपयुक्त कार्य कसें करतां येईल, ह्याविषयीं चर्चा करण्या- एक बैठक भरणार आहे. तीमध्यें भाग घेण्यासाठी सहकारी वळीशीं संबंध असलेल्या चौदा तज्ज्ञांना निमंत्रण करण्यांत आलें रिझर्व्ह बँकेचे अधिकारीहि उपस्थित राहून चर्चेंत भाग घेतील. २ फेब्रुवारी रोजीं बैठकीस प्रारंभ होऊन ती तीन दिवस . प्रा. धनंजयराव गाडगीळ हे अध्यक्षस्थान स्वीकारतील.

---

### पार्लमेंटच्या सभासदांना रेल्वे पास

र्लमेंटच्या प्रत्येक सभासदास वर्षभर सर्वत्र भारतभर चालणारा ास देण्याचा मध्यवर्ती सरकार विचार करीत आहे. सध्यां हे द कामासाठी प्रवास करतात, तेव्हां त्यांना १३ पहिल्या भाडें मिळतें; मग ते प्रवास कसाहि करोत.

---

### दि इंडियन बँक लि., मद्रास

लि बँकेस १९५०साली १५,५९,८८१ रु. नफा झाला. सालचा नफा १२,५६,८८९ रु. होता.


# पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनकोसोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.**

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें; ऊंस गाळण्याचे चरक; सल्फेट व इतर खतें; पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धावपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

**वेळ श्रम व खर्चाची बचत करण्यासाठीं**



***ॲग्रिको फावडीं वापरा**

टाटा ॲग्रिको फावडीं खास जास्त कार्बन असलेल्या पोलादापासून बनविण्यांत येतात व त्यांना नीट तपासणी केलेले लाकडी दांडे बसविलेले असतात. हीं फावडीं वापरण्यास अत्यंत सोईस्कर असल्यानें तीं वेळेची व श्रमाची बचत करतात! शिवाय अत्यंत मजबूत व टिकाऊ असल्यानें—तीं वापरणें अखेरीस फायदेशीरच पडतें!

**अंतिम काटकसरीसाठीं टाटा ॲग्रिको हत्यारें खरेदी करा!**

## टाटा ॲग्रिको अवजारें

A I C TRADE MARK

शाखा: मुंबई, मद्रास, कानपूर, जलंधर, नागपूर, विजयनगरम व सिकंदराबाद.

* नजिकच्या लोखंडी-सामानाच्या दुकानांत चौकशी करा अगर परस्पर आम्हांला लिहा.

## आम्हीं फार का आहोत ?

(डॉ. र. पु. परांजपे)

कोणताहि देश सर्व बाबतींत स्वयंपूर्ण असणें अगदीं शक्य नसणारच; परंतु मुख्य मुख्य बाबतींत तो बऱ्याच प्रमाणांत स्वावलंबी असला पाहिजे. तशांत आमच्या देशांतील लोकसंख्या ३५ कोटींच्या घरांत असल्यामुळें आपणांस आपल्या मुख्य मुख्य गरजांकरितां दुसऱ्या देशांच्या तोंडाकडे पाहावें लागलें तर आपली स्थिति करुणास्पद होईल, व ती गेल्या कांहीं वर्षांत झालेली सुद्धा आहे. गेल्या महायुद्धांत ब्रह्मदेश वगैरे मधून तांदूळ व इतर धान्यें येण्याचें बंद झाल्यामुळें बंगालमधील तीस–चाळीस लाख लोक प्राणास मुकले. सुमारे ५० वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांतून गहूं व इतर धान्यें कांहीं प्रमाणांत निर्यात केलीं जात असत. आतां कित्येक कोटी रु. चें धान्य अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया अर्जेंटाईन, इजिप्त, ब्रह्मदेश सयाम वगैरे देशांतून इकडे आणावें लागतें व युद्धाच्या वेळीं हिंदी जनतेनें कित्येक क्लेश सोसून जी गंगाजळी जमविली होती, तिचा बराचसा भाग संपून गेला आहे. यांचें कारण एकच; तें म्हणजे अखंड हिन्दुस्थानची लोकसंख्या १० कोटींपेक्षां जास्त वाढली आहे. आतां तर हिंदुस्थानच्या फाळणीमुळें भारताची स्थिति जास्तच केविलवाणी झाली आहे. पूर्वीं ज्या प्रांतांत तेथील लोकांच्या गरजेपेक्षां बरेंच जास्त धान्य पिकत होतें–म्हणजे सिंध व पश्चिम पंजाब–ते आतां पाकिस्तानमध्यें गेले असल्यामुळें भारताला भासणारी तूट जास्तच जाणवूं लागली आहे. यावरून हल्लींच्या भारताच्या परिस्थितींत आपली लोकसंख्या वाजवीपेक्षां जास्त आहे असें दिसून येईल. या तुटीला तोंड देण्याकरितां रेशनिंग व नियंत्रण सुरू करणें, एकादा दिवस उपास करणें पूरक अन्न पदार्थ उपयोगांत जास्त आणणें, वगैरे तात्पुरते सरकारी व निमसरकारी उपाय योजले जात आहेत, व त्यांच्या मागोमाग काळाबाजार, साठेबाजी, लाचलुचपत वगैरे अरिष्टें जास्त फोफावत आहेत.

या तात्पुरत्या उपायाबरोबरच सरकारकडून दुसऱ्या मूलगामी योजनाहि आखल्या जात आहेत. या बहुतेक अंशीं अजूनपर्यंत कागदावरच आहेत. त्यावर जोर देऊन मी काढलेल्या अनुमानाचे विरोधी म्हणतात कीं, हिंदुस्थानची अथवा भारताची लोकसंख्या कांहीं जास्त नाहीं व तिच्या हल्लीं होणाऱ्या वाढीलाहि आपल्याला तोंड सहज देता येईल. पण हीं सर्व योजना पूर्ण व्हावयास कांहीं वर्षें तरी लागतील, त्या वेळांत दरसाल ४०–५० लाखांनीं लोकसंख्या वाढतच असेल. तेव्हां या रीतीनें आपल्या वाजवीपेक्षां मोठ्या व जोरानें वाढत जाणाऱ्या लोकसंख्येचा प्रश्न पुरा सुटेल असें दिसत नाहीं. त्या पुऱ्या होण्यास शेकडो कोटी रु. लागतील. आपल्या जवळ मोठ्या प्रमाणांत नसलेल्या इंजीनियर व इतर तज्ज्ञ त्यांकरितां लोकांची गरज लागेल, व दहा वीस वर्षें तरी त्या सर्व पूर्ण व्हावयास लागतील. या सर्व उपायांची हेटाळणी करण्याचा माझा उद्देश नाहीं, ते सर्व चांगले आहेत व अवश्य करावे. परंतु या योजना व उपाय दीर्घकालीन आहेत. तेव्हां या क्षणीं आपली लोकसंख्या योग्यतम नसून त्यापेक्षां पुष्कळच जास्त आहे. या माझ्या विधानास बाध येत नाहीं. योजना पुऱ्या होऊन धान्याचें उत्पादन वाढलें म्हणजे त्या प्रमाणांत लोकांची संख्या चटकन् वाढेल यांत शंका नाहीं. दुसऱ्या देशांचा असा अनुभव आहे कीं कोणत्याहि कारणांनीं अन्नपरिस्थिति अनुकूल झाली म्हणजे लोकसंख्या वीस पंचवीस वर्षांत दुप्पटहि होते. तेव्हां सरकार हल्लीं ज्या योजना आखीत आहे त्या पूर्ण फळास आल्यावर त्यापासून होणारें जादा धान्य खाण्यास आमच्या देशांत पुरेशीं तोंडें असणार नाहींत, ही भीति व्यर्थ आहे.

आतापर्यंत आपण प्रत्येक माणसाला फक्त जीव धरून राहावयास जें किमान अन्न लागतें तें त्याला मिळणें शक्य आहे किंवा नाहीं या गोष्टीकडे मात्र लक्ष देत आहों. अन्न कोणत्या दर्जाचें असावें, तें पोषणशास्त्रज्ञांच्या मताप्रमाणें चांगलें पोषक आहे काय या प्रश्नाकडे हल्लींच्या कठीण अन्नपरिस्थितींत फारसें लक्ष दिलें जात नाहीं. परंतु तज्ज्ञांच्या मतें हिंदुस्थानांतील बऱ्याच भागांत सामान्य लोक जें अन्न खातात तें अगदीं निकृष्ट प्रकारचें असतें. मनुष्याच्या पौष्टिक अन्नामध्यें नुसत्या अमुक वजनाचें पिष्टमय अन्न पाहिजे एवढेंच नव्हे, तर त्यांत दूध व त्यापासून होणारें तूप, लोणी, ताक, दही वगैरे पदार्थ, अंडीं, सागोती, पिकलेलीं फळें, पालेभाजी वगैरे योग्य प्रमाणांत असलीं पाहिजेत. परंतु या सर्व पदार्थांचा आपल्याकडे अतिशय तुटवडा आहे. या सर्व वस्तु पुरवावयाच्या म्हटल्या म्हणजे देशांतील जमिनीचा बराच भाग त्या उत्पन्न करण्याकडे लावावा लागेल. उत्पादन मनुष्याच्या मर्जीप्रमाणें बऱ्याच अंशानें वाढवितां येतें, परंतु क्षेत्र हें ठराविक असतें; ह्याचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करणें एवढेंच काय तें मानवाच्या हातीं आहे. तो तसा केला तरी त्याला एक उंच सीमा असणारच. तेव्हां या बाबतींचा साकल्यानें विचार करून आपण फार का आहोंत ? या प्रश्नाचा निर्णय केला पाहिजे.

देशांतील जनता जर शारीरिक, मानसिक, बौद्धिक व नैतिक दृष्टीनें जोमदार व कार्यक्षम असेल तरच देशाची प्रगति झटपट होईल. अमेरिकेंत फक्त १५ कोटी लोक आहेत, रशियामध्यें सुमारें १७ कोटी आहेत, व ब्रिटनमध्यें ५ कोटी आहेत. भारतांत ३५ कोटी व चीनमध्यें सुमारे ४५ कोटी लोक असूनहि त्यांची अमेरिका, रशिया व ब्रिटन यांच्याशीं तुलना करणें किती हास्यास्पद आहे हें सहज दिसून येईल. " वरमेको गुणी पुत्रो नच मूर्ख शतान्यपि " हें सुभाषित आम्हीं लहानपणी भांडारकरांच्या पहिल्या संस्कृत पुस्तकांतुन शिकलों होतों. त्याच्याच अनुरोधानें भारतांत २५ कोटीच लोक शरीरानें सुदृढ, बुद्धीनें तरतरीत व शीलानें चारित्र्यवान् असले तरी पुरवले, परंतु दुबळे, अनुत्साहि, उदासीन, स्वार्थसाधू व हलक्या नीतिमत्तेचे लोक ३५–४० कोटी असले तरी ते देशकार्य व देशसंरक्षण करण्यास समर्थ होणार नाहींत हें खास.

(२८ नोव्हेंबर १९५० रोजीं मुंबई नभोवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित केलेलें भाषण, केंद्राधिकाऱ्यांच्या कृपेनें उद्धृत.)

---

### कल्याण पीपल्स बँकेची डोंबिवली शाखा

दि कल्याण पीपल्स को. बँक लि. च्या डोंबिवली शाखेचा उद्घाटन समारंभ ता. २८ जानेवारी, १९५१ रोजीं सकाळीं ९ वाजतां डोंबिवली स्टेशन नजीक मराठी शाळेमध्यें श्री. पी. जे. चिन्मुलगुंद, रजिस्ट्रार को. सो., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

Dr. WAMAN GOPAL'S SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं ' दुर्गाधिवास ', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.